अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २६३ ■ बुधवार दि.११ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 263 ■ Wedbesday Dt.11 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

## बीड जिल्ह्यात चोरट्यांचा सुळसुळाट

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात सध्या उघडपणानी चोर हे फिरत असून भर रस्त्यावर महिलेच्या गळ्यातील गंठन ओढून चोरून घेऊन जाण्याच्या घटना ह्या दिवसेंदिवस वाढत आहे.

या घटना घडत असताना शहरातीलसीसीटीव्ही मात्र नेहमी सारखे बंद पडल्याचे दिसत आहे. बीड शहरातील सहयोग नगर परिसरातून एक विवाहित महिलेचे भर दुपारी दोन भामट्यांनी गळ्यातून गंठन ओढून पाल काढला, हे करत असताना विवाहित महिला, थोडक्यात वाचली. तर सध्या चाकार्वाडीत सुरू असलेल्या शिव महापुराण कथेत तीन ते चार महिलांचे

दागिने, भाविकाचे पैशाचे पाकीट हे चोरट्यांनी चोरले आहे. बीड शहरासह जिल्ह्यात गर्दीच्या ठिकाणी सध्या मोठ्या प्रमाणावर भुरटे चोर फिरताना दिसत आहेत. करोडो रुपये खर्च करून शासनाने जिल्ह्यात अनेक ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा बसवली मात्र ती केवळ नावापुरतीच असल्याचे अनेक घटना मधून समोर आले आहे. त्यामुळे भामट्या चोरांचे यातून फावत आहे. बीड शहरातील अनेक मोठमोठ्या चौकात सीसीटीव्ही बसवले आहेत, यातून शहरात येणार्या जाणार्या प्रत्येकाचे निरीक्षण होणे अपेक्षित असताना दुसरीकडे हे कॅमेरेच बंद असल्याचे दोन तीन घटने मधून समोर आले आहे. सध्या चाकरवाडी येथे लाखो भाविकांच्या उपस्थितीत मध्ये शिव महापुरान कथा कार्यक्रम सुरु असून याठिकाणी तर चोरटयासाठी ही एक पर्वणीच ठरत आहे. पहिल्याच दिवशी तीन महिलांचे दागिने, चार पाच जणांचे पैशाचे पाकीट, आणि तीन ते चारा मोबाईल हे चोरीस गेले आहे. या ठिकाणी मोठा पोलीस बंदोबस्त आहे, मात्र तरी अशी घटना घडत आहे, याशिवाय शहरात भर दिवसा जिल्हा रुग्णालयातील कर्मचार्याच्या घरातून सहा लाख नव्वद हजाराचे दागिने याच घरात घरकाम करणार्या महिला मजूर लक्ष्मी वडमारे यांनी चोरून नेले आहे.

# बीड जिल्ह्यात मोफत वाळू योजना नावापुरतीच!
# दलाल अन् वाळू माफियांचाच होतोय फायदा?

### सामान्य नागरिकांना वाळूसाठी तब्बल ३५ हजार मोजावे लागतायत, नागरिकांचा संताप?
### जर महसूल प्रशासनाने घरकुल बांधकामास लाभार्थ्यांना कुपन दिले तर वाळू काढायची कोठून?

## हप्तेखोर महसूल व पोलीस प्रशासनाच्या आशीर्वादाने वाळू माफियांचा गोदापात्रात नंगानाच
## गोदावरी पात्रातून रात्रंदिवस होतोय बेसुमार वाळू उपसा; प्रशासनाचे अर्थपूर्णावर लक्ष?

बीड । प्रतिनिधी

शासनाच्या विविध घरकुल योजनांसाठी मोफत वाळू देण्याची योजना सरकारकडून आणण्यात आली. माजलगावात प्रत्यक्षात मात्र या योजनेची अंमलबजावणी होताना दिसून येत नसल्याचे सांगितले जात आहे. घरकुल धारकांना मोफत वाळू भेटण्याऐवजी त्यांच्या खिशावर मोठा भार पडत आहे. वाळू मोफत मिळेल असं सरकार सांगतंय पण वस्तुस्थिती वेगळीच आहे. नदी पात्रातून वाळू काढण्यासाठी एक ट्रॅक्टर ट्रीपचं दर दोन ते हजार रुपये आहे. असे ५ ट्रॅक्टर लागतात ज्याला खर्च दहा ते पंधरा हजार रुपये येतो. यानंतर ही वाळू हायवा भरण्यासाठी पाच हजार रुपये घेतले जात आहेत. याप्रमाणे सामान्य नागरिकाला तब्बल ३० हजार ते ३५ हजार रुपये मोजावे लागत आहेत. खरं तर मोफत वाळू योजना जनतेच्या फायद्यासाठी होती. पण सध्या ती खासगी दलाल आणि ट्रॅक्टर मालकांच्या फायद्याची बनली आहे. आता तरी याकडे सरकारने लक्ष घालावं, आणि वाळूचा हा वाळू माफियांचा बाजार बंद करावा अशी मागणी होत आहे.



तसेच घरकुलासाठी अल्पदरात वाळू पुरवण्याची जबाबदारी शासनाने तहसीलदारांवर सोपवली. असली तरी अद्याप तालुक्यात एकाही लाभार्थ्यांना वाळू पुरवठा झाला नसल्याने पुढे काय होणार? संबंधित अधिकाऱ्यांवर काय कार्यवाही होणार? तहसीलदार काय भूमिका घेणार? याकडे लाभार्थ्यांचे लक्ष लागले आहे. लाभार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन यावर्षी ५० हजार वाढीव तरतूद करत घरकुल बांधकामास अल्पदरात वाळू पुरवण्याची जबाबदारी शासनाने तहसीलदारांवर यांच्यावर सोपवली आहे. वाळू लाभार्थ्यांना नाही मिळाली तर तहसीलदारांवर कारवाई करण्याचे फर्मान काढले असले तरी अद्याप तालुक्यात एकाही लाभार्थ्यांना रेती वाळू मिळाली नसल्याचे

▶ पान २ वर

### खासगी दलाल, एजंट अन, ट्रॅक्टर मालकाचा वाटा

शासनाने जाहीर केलेल्या मोफत वाळू योजनेचा उद्देश म्हणजे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ नागरिकांना घरबांधणीसाठी मदत मिळावी. पण इथे ही योजना दलाल आणि माफियांकडून हडप केली जात असल्याचा आरोप होत आहे. मोफत रेतीचे नियमानुसार वितरण न होता तीच वाळू नागरिकांना पैसे मोजून खरेदी करावी लागत आहे. काही ठिकाणी तर यासाठी हप्ते पद्धतीनेही पैसे घेतले जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

## अवैध वाळुची चोरटी वाहतुक करणारे टेम्पोवर कारवाई




बीड । प्रतिनिधी

दि.१०/०६/२०२५ रोजी पोउपनि श्री. काकरवाल, पोउपनि श्री. कुकलारे, पोह/१२८० प्रसाद कदम, पोना/१९२५ दादासाहेब सानप हे पोलीस ठाणे ग्रामीण हद्दीत पेटोलींग करत असताना रामगड ता. जि.बीड जवळ त्यांना गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, वासनवाडी कडुन कुमशीकडे जाणारा रोडवर ०९.३० वा. सु. एक टेम्पो टाटा-७०९ ब्राउन रंगाचा पासींग क्रं. चक-१४ एच्-३४९२ त्यामध्ये विनापरवाना बेकायदेशीर वाळु चोरीकरुन टेम्पोमध्ये भरुन वाळुची चोरटी विक्री करणे करता जात असताना मिळुन आल्याने त्यास थांबवून टेम्पोवरील ड्रायव्हर नामे- गोकुळ किसन गायकवाड रा. वासनवाडी ता.जि. बीड असा चालक मिळुन आल्याने त्यास वाळू वाहतुकी बाबत कायदेशीर

▶ पान २ वर

## पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत तलवार बाळगणारा पोलिसांच्या ताब्यात



बीड । प्रतिनिधी

पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंदे तसेच गुंडगिरीच्या प्रमाणात वाढ झाली असून अवैध धंदे, गुंडगिरी करणाऱ्यावर पोलिसांकडून कठोर कारवाई करण्यात येत असून काहीना हद्दपार करण्यात आले आहे.

पेठ बीड पोलिसांना गुप्त माहिती मिळाली की एमआयडीसी भागात एक इसम दोन धारधार तलवारी घेऊन दहशद माजवत फिरत असल्याची माहिती मिळालीअसता.त्या ठिकाणी जाऊन तलवारी घेऊन फिरणाऱ्याला ताब्यात घेतले असता त्याचे नाव नितीन मधुकर धुनघव वय ३४ वर्षे

▶ पान २ वर

## ना जातीचा ना धर्माचा एक हात मदतीचा...
## दीपक थोरात यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे नियुक्तीपत्र देऊन केली घोषणा

### महाराष्ट्र आधार सेनेच्या तालुकाप्रमुखपदी सतीश हनवते, धारूर ऊसतोड कामगार प्रमुखपदी अर्जुन बाबू पाटोळे यांची निवड



वडवणी । प्रतिनिधी

महाराष्ट्र आधार सेना वडवणी तालुका प्रमुख पदी सतीश हनवते बीड उपजिल्हाप्रमुखपदी अनिल आव्हाड, वडवणी तालुका प्रमुख पदी ऊसतोड मजूर कामगार आघाडी उमेश आव्हाड, ऊसतोड मजूर कामगारा धारूर तालुका प्रमुख पदी अर्जुन पाटोळे, वडवणी तालुका कार्याध्यक्षपदी सचिन पाटोळे, वडवणी युवक शहर प्रमुख पदी अर्जुन सरवदे, वडवणी युवक उपशहर प्रमुख पदी प्रशांत गव्हाणे, वडवणी तालुका विद्यार्थी आघाडी प्रमुखपदी अभिषेक आडागळे यांच्या निवडी करण्यात आल्या. यावेळी ना जातीचा ना धर्माचा हीच ब्रीदवाक्य घेऊन दीपक थोरात यांनी काही दिवसापूर्वीच महाराष्ट्र आधार सेना या नवीन सामाजिक संघटनेचे उद्घाटन बीड येथे भव्य दिव्य अशा स्वरूपामध्ये नीलकमल हॉटेल या ठिकाणी केले आहे.

या ठिकाणी अनेक कार्यकर्त्यांनी आपली उपस्थिती दर्शवली. दीपक भाऊ यांच्या कार्याची दखल घेत त्याना पाठिंबा दिला दीपक थोरात यांच्या १८ पगड जातीतील बीड जिल्ह्यामध्ये येणाऱ्या अडीअडचणी असतील बीड जिल्हा रुग्णालय असेल किंवा महाराष्ट्रातील कुठलाही दवाखाना असेल आरोग्य जनसेवा म्हणून त्यांची ओळख आहे. त्या महाराष्ट्रामधील अनेक दवाखाने व पोलीस स्टेशन मध्ये सर्वसामान्यांच्या मदतीसाठी अन्याय अत्याचाराच्या विरोधामध्ये आवाज उठविणाऱ्या दीपक थोरात यांना दैनिक महाराष्ट्र आरंभच्या माध्यमातून आज महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यामध्ये ओळखलं जात आहे. यावेळी मात्र आता ना जातीचा ना धर्माचा हे ब्रीदवाक्य घेऊन महाराष्ट्र आधार सेना ही मैदानात उतरलेले आहे. यावेळी वडवणी धारूर तालुक्यातील अनेक कार्यकर्त्यांच्या निवडी करण्यात आल्या.

या ठिकाणी येणाऱ्या काळामध्ये १८ पगड जातीला

▶ पान २ वर

## बीड जिल्हा परिषदेला नवीन कर्तव्यदक्ष व खमक्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिळाले!
### भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी कर्मचाऱ्यांसह दलालांचे धाबे दणाणले; कर्तव्यदक्ष अधिकारी मिळाल्याने आनंद व्यक्त!

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित कर्तव्यदक्ष मुख्य कार्यकारी अधिकारी मुंरूगानथम.एम ( भा. प्र. से ) हे त्यांच्या कार्य काळामध्ये त्यांनी यापूर्वी गोंदिया जिल्हा परिषद चे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून पदभार सांभाळला त्या ठिकाणी असणारे अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमाला अधिक राहून शिस्त प्रिय पद्धतीने काम करून घेतलं त्यांनी त्यांच्या काळामध्ये वेगवेगळ्या शासनाच्या योजना जनतेच्या दारापर्यंत पोहोचवण्याचं काम केलं जे भ्रष्टाचार करणारे त्यांच्या विरोधामध्ये त्यांनी कारवाईचा बडगा उभारला होता तसेच कार्यालयातील कोणतेच कर्मचारी अधिकारी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनामध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळ घालवायचा नाही ज्या काही फाईली असतील त्या नियमानुसार माझ्या ऑफिसमध्ये पाठवायच्या अशा शिस्तप्रिय मुख्य कार्यकारी अधिकारी बीड जिल्ह्याला मिळाले तसेच बीड जिल्ह्यामध्ये भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना ते सोडणार नाहीत गोरगरिबांना न्याय देण्याचा ते प्रयत्न करतील अशी अपेक्षा आहे.

इंजिनीयर सादिक इनामदार राष्ट्रीय अध्यक्ष भ्रष्टाचार निर्मूलन समिती मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांच्यासमोर खाजगी शिक्षक भरती घोटाळा तसेच बांधकाम विभागातील घोटाळा व जिल्हा परिषद मधील घोटाळा करणारे अधिकारी जल जीवन घोटाळा या सर्व घोटाळ्याचा त्यांना सामना करावा लागेल ते सामना

▶ पान २ वर



# वारकरी दिंडी नृत्य स्पर्धेत शालेय विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवावा : स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा



अंबाजोगाई । प्रतिनिधी
सर्व भाविक भक्तांना शालेय विद्यार्थ्यांना व पालकांना कळविण्यात येते की प्रतिवर्षाप्रमाणे आषाढी वारी निमित्त संत श्रेष्ठ नामदेव महाराज नरसी नामदेव व संत श्रेष्ठ जनाबाई गंगाखेड यांच्यासह अनेक पालख्या या विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे प्रस्थान करतात यानिमित्ताने संपूर्ण मराठवाड्यातील पहिले ऐतिहासिक भव्य अश्व रिंगण आपल्या अंबाजोगाई मध्ये संपन्न होत आहे. या सोहळ्याच्या निमित्ताने योगेश्वरी शिक्षण संस्थेच्या भव्य मैदानावर पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांसाठी वेगवेगळ्या गटांमध्ये भव्य वारकरी दिंडी स्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.
आपल्या लहान मुलांवर भारतीय संस्कृतीचे विशेष करुन वारकरी सांप्रदायाचे संस्कार रुजावेत. तसेच वारकरी संप्रदायाच्या शिकवणीप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यांमध्ये सर्वधर्मसमभाव जोपासला जावा, त्यांच्यामध्ये नेतृत्व गुण विकसित व्हावेत, सर्वांना सोबत घेऊन चालण्याची सत्प्रवृत्ती निर्माण व्हावी यासाठी या स्पर्धेचे विशेष करून आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेसाठी तिन्ही गटांमध्ये प्रथम पारितोषिक ३१००/- रुपये स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र द्वितीय पारितोषिक २००१/- -रुपये स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र तृतीय पारितोषिक १००१/- रुपये स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र उत्तेजनार्थ ५००/- रुपये प्रमाणपत्र प्रत्येकी दोन याप्रमाणे ठेवण्यात आलेले आहेत. हजारो वारकरी व भाविक भक्तांच्या उपस्थितीमध्ये भव्य अश्व रिंगण सोहळा गुरुवार दिनांक २६ जून २०२५ गुरुवार रोजी संपन्न होणार आहे. याच दिवशी शालेय वारकरी समूह दिंडी नृत्य स्पर्धा स्पर्धा दुपारी ठीक बारा वाजता योगेश्वरी महाविद्यालयाच्या मैदानावर प्रारंभ होतील.

**अंबाजोगाई शहरातील सर्व शाळांनी विद्यार्थ्यांची तयारी करून घ्यावी : वारकरी**

दिंडी मध्ये वारकरी पोशाखा सोबतच विविध संतांचा पोशाख असणे अभिप्रेत आहे. अंबाजोगाई शहरातील सर्व शाळांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना या स्पर्धेमध्ये सहभागी करून घ्यावे असे आवाहन भव्य अश्व रिंगण सोहळा संयोजन समितीचे स्वागताध्यक्ष नंदकिशोर मुंदडा व सचिव तालमार्तंड प्रकाश बोरगावकर यांनी केले आहे.
नाव नोंदणीसाठी संपर्क:-
१) श्री. प्रकाश बोरगावकर-७५१७६६४७६१२) श्री, बळीराम चोपणे- ७२१९२५०९९९ ३) श्री, आनंत अरसुडे-७२७६१८९९९

# दुरुतीच्या नावाखाली विद्युत पुरवठा नवनवी कारणे देत सतत खंडित




घाटनांदुर । प्रतिनिधी
घाटनांदुर येथे विद्युतपुरवठ्यासाठी स्वतंत्र सबस्टेशन असून सुद्धा कित्येक दिवसांन पासून कायमस्वरूपी सतत भारनियमन सुरु आहे. सबस्टेशनच्या मधील कधी तर गिरवली पॉवरस्टेशन मधील दुरुतीच्या नावाखाली ५-६ तास दिवसातून विद्युत पुरवठा खंडित केला जात आहे.
तसेच घाटनांदुर हे अंबाजोगाई तालुक्यातील सर्वात मोठी व्यापारी बाजारपेठ असणारे व लोकसंख्या जास्त असणारे गाव आहे. त्यामुळे अनेकांचे व्यवसाय हे विद्युत सोबत जोडलेले आहेत.आता शेती मशागत व पेरणीचे दिवस आहेत. त्यामुळे बैल चलित अवजारे बनवणे तसेच ट्रॅक्टर चलित यंत्र, तसेच अवजारांची मोडतोड दुरुस्ती हे काम खोळंबत आहेत.विद्युत पुरवठा खंडित दिवसभर असल्यामुळे शेतकऱ्यांची धांदल मोठ्या प्रमाणावर उडताना दिसत आहे. पूर्वी घाटनांदुर येथील सबस्टेशन मधून पूस, गिरवली, घाटनांदुरसह इतर २० खेड्यांना अखंडित विद्युतपुरवठा होत होता.
आता आनंदवाडी येथे सबस्टेशन झाले. तसेच पूस येथे सबस्टेशन झाले तर, घाटनांदुर येथे ही स्वतंत्र सबस्टेशन असताना भारनियमन का होत असेल असा प्रश्न? उपस्थित होत आहे. घाटनांदुर सबस्टेशन मध्ये सौरऊर्जेचा प्रकल्प पण आहे. तरी सुद्धा सतत वेगवेगळी कारणे देत विद्युत पुरवठा खंडित होत आहे. आणि दुसऱ्या बाजूला वीज देयक भरणाऱ्यांची संख्याही मोठी आहे. आणि घाटनांदूर येथील महावितरण कंपनीच्या कर्मचारी विद्युत देयक वसुली ही भरपूर प्रमाणात होते. मग ग्राहकांनी वीज देयक भरल्यानंतरही अशाप्रकारे वारंवार विद्युत पुरवठा सतत खंडित होत असल्याने व सुरू असताना सुरुळीत चालत नसल्याने घाटनांदुर व इतर २० खेडी गावातील नागरिकांचा संताप होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# मुंबईतील उद्योजक समीर शाह यांचा प्रशंसा प्रमाणपत्राने सन्मान




मुंबई । प्रतिनिधी
मुंबईच्या प्रसिद्ध उद्योजक आणि समाजसेवक, समीर शाह यांना भारत सरकारच्या वतीने साकीनाका मुंबई येथील पांचतारांकित हॉटेल मारिओटमध्ये आयोजित सिमपॉजियम व भारतीय पोस्ट यांच्यात करार कार्यक्रम अंतर्गत २०२४-२०२५ या वर्षासाठी महाराष्ट्र राज्य पोस्टल वाढीमध्ये उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल प्रशंसा प्रमाणपत्राने गौरवण्यात आले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली उभारलेल्या एस एम इंटरप्रायजेस या कंपनीने त्यांच्या शून्यातून विश्व उभारण्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवला आहे.
समीर शाह यांच्या कामकाजामध्ये नावलौकिक खोदला असून त्यांनी शासनाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रियपणे भाग घेतला आहे. ते गरीब आणि होतकरू व्यक्तींच्या मदतीला सदैव तत्पर असतात. मुस्लिम अल्पसंख्यक समुदायात त्यांच्या योगदानामुळे त्यांचा सत्कार केला जातो, तरीसुद्धा त्यांनी अमली पदार्थ विक्रीविरुद्ध एक ठाम भूमिका घेतली आहे आणि समाजात नशामुक्तीसाठी सतत प्रयत्नशील आहेत.
त्यांच्या कामाच्या सर्व स्तरांवर प्रशंसा होत असून, समीर भाईजान यांना शासनाच्या पोस्ट विभागात प्रशंसा प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे अभिनंदन सर्वत्र सुरू आहे. समीर शाह यांच्या अभूतपूर्व कार्यामुळे आणि त्यांच्या मृदुभाषित व मनमोहक व्यक्तिमत्वामुळे समाजात एक सकारात्मक परिवर्तन घडत आहे.
समीर शाह यांना गोल्डमॅन म्हणून ओळखले जाते. त्यांच्या यशामागे त्यांची अर्धांगिनी मरियम बेगम यांची महत्त्वाची साथ आहे. शाह म्हणतात की, त्यांच्या यशात त्यांचं योगदान अनमोल आहे. त्यांची अद्वितीय धाडसाची आणि आकर्षक कार्यक्षमता मोठ्या प्रमाणावर चर्चा का विषय आहे, ज्यामुळे ते देशभक्त समाजसेवक आणि उद्योजक असा आदर्श बनले आहेत.

# तेलगाव येथील महामार्गावरील साठलेला पाण्याचा प्रश्न गंभीर

## एम.आर.डी.सी. च्या अभियंत्यांनी पाहणी करुन दिले आश्वासन



तेलगाव । प्रतिनिधी
धारूर तालुक्यातील तेलगाव येथील येथून जाणाऱ्या महामार्गावरील साठलेल्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला असून हा प्रश्न तेलगाव येथील नागरिकांनी उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार, खा. बजरंग सोनवणे,आ. प्रकाश सोळंके यांना निवेदन देऊन कानावर घातल्यानंतर एम.आर.डी. सी. च्या अधिकारी आणि अभियंत्यानी आज तेलगाव येथे येऊन पाहणी केली. पाण्याचा निचरा करण्यासाठी उपाययोजना करुन महामार्ग मोकळा करुन देण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले. लवकरात लवकर हा प्रश्न सोडवला तर ठीक नाहीतर रस्त्यावर उतरण्याचा इशारा यावेळी नागरिकांनी दिला.
धारूर तालुक्यातील मौजे तेलगाव येथून खामगाव सोलापूर हा महामार्ग जातो. या महामार्गाचे काम अतिशय निकृष्ट दर्जाचे झाले असून जागोजागी भेगा पडल्यामुळे अनेक अपघात होऊन अनेक लोकांचा बळी गेलेला आहे. तेलगाव येथे या महामार्गावर पावसाने पाण्याचे तळे साचले आहे. या पाण्यात घसरून अपघाताचे प्रमाण वाढले आहे. हा प्रश्न गंभीर बनला आहे याबाबत तेलगाव येथील नागरिकांनी खा. बजरंग सोनवणे, माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रकाश सोळंके यांची भेट घेऊन निवेदन दिले. आ. सोळुंके यांनी या प्रकरणाची दखल घेत एम.आर.डी. सी. कंपनीच्या अभियंत्याला चांगले सुनावले. महामार्गावर साठलेल्या पाण्यामुळे अपघाताला आमंत्रण मिळते आहे. तुम्हाला दुरुस्तीचे काम करायचे नसेल तर मानसं मरू द्यायचे का असा संतप्त सवाल आमदार सोळुंके यांनी सदर कंपनीच्या अभियंताला विचारला. लवकरात लवकर या पाण्याचा निचरा करून नागरिकांचा प्रश्न सोडवावा असा आदेश आमदार प्रकाश सोळंके यांनी अभियंताला दिला.
आ. सोळंके यांनी दखल घेऊन देखील एम.आर. डी. सी. कंपनीचे अधिकारी तेलगाव येथे फिरकले नाहीत. ग्रामस्थांनी उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांना फोन करुन माहिती दिली. अजितदादांनी यांची दखल घेऊन प्रश्न मार्गी लावण्याचे आदेश दिल्यानंतर एम. आर.डी. सी.चे अधिकारी श्रीमती सुनिता वनवे, अतुल कोट्याचा यांनी बुधवार दिनांक ११ जुलै रोजी तेलगाव येथे येऊन महामार्गाची पाहणी केली. पाण्याचा निचरा करण्यासाठी उपाययोजना करण्याचे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.
यावेळी तेलगाव येथील जेष्ठ नागरिक तथा माजी शिक्षणाधिकारी आर. बी. लगड, सरपंच बाबुराव धुमाळ, महेश लगड, विकास लगड, नामदेव सावंत, पवन गायकवाड अमर लगड, राहुल गायकवाड, किशोर गायकवाड, अतुल लगड, जाधव अक्षय लगड विष्णू, गिरीराज फरतडे, विष्णू मोरे यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कोल्हापूर येथे हिमोफिलिया रुग्णांसाठी प्रभावी उपक्रम, मोफत फॅक्टर, सेल्फ इफ्युजन व फिजिओ थेरेपी कॅम्प चे आयोजन



कोल्हापूर । प्रतिनिधी
कोल्हापूर येथे हिमोफिलिया या रक्तस्त्रावाशी संबंधित गंभीर आजाराने त्रस्त रुग्णांसाठी साताऱ्यात एक अत्यंत दिलासादायक आणि आशादायी उपक्रम राबवण्यात आला. इंटास फाउंडेशन आणि दाभोळकर ट्रस्ट हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने दाभोळकर हॉस्पिटलच्या आवारात मोफत फॅक्टर डिस्ट्रीब्युशन तसेच सेल्फ-इन्फ्यूजन आणि फिजिओथेरपी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून तब्बल ७० रुग्णांना थेट लाभ झाला असून, १४० फॅक्टर्सचे मोफत वितरण करण्यात आले. या उपक्रमामुळे रुग्णांच्या उपचार प्रक्रियेत सकारात्मक बदल घडून आल्याचे स्पष्टपणे जाणवले.
हिमोफिलिया हा असा विकार आहे, ज्यामध्ये रक्त गोठवण्यासाठी लागणाऱ्या फॅक्टर ८ व फॅक्टर ९ घटकांची कमतरता असते. यामुळे जखम किंवा अंतर्गत रक्तस्त्राव थांबविणे कठीण होते. या आजारावर उपचार म्हणून लागणारी औषधे अत्यंत महागडी असल्याने, ग्रामीण भागातील व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी उपचार घेणे मोठे आव्हान ठरते. या पार्श्वभूमीवर इंटास फाउंडेशनने सामाजिक बांधिलकी जपत हिमोफिलिया रुग्णांसाठी मोफत औषध वितरणाचा निर्णय घेतला, आणि त्या निर्णयाला प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या पातळीवर यशस्वीरित्या मूर्त स्वरूप देण्यात आले.
या शिबिरामध्ये केवळ औषधेच वितरित केली गेली नाहीत, तर रुग्णांना त्यांच्या स्वतःच्या उपचार प्रक्रियेत आत्मनिर्भर बनवण्यासाठी सेल्फ-इन्फ्यूजन प्रशिक्षणही देण्यात आले. कांचन सिस्टर यांनी उपस्थित रुग्णांना आणि त्यांच्या पालकांना फॅक्टर स्वतः सेल्फइन्फ्यूजनची यौग्य प्रक्रिया, इन्फ्यूजन घेण्याची योग्य पद्धत, स्वच्छतेची आवश्यक काळजी, तसेच औषधोपचाराच्या वेळा याबाबत सखोल माहिती दिली. फक्त औषधोपचार नव्हे, तर योग्य व्यायाम, दररोजच्या हालचाली, आणि फिजिओथेरपीचे महत्त्व यावरही विशेष भर देण्यात आला. फिजिओथेरपिस्ट सिंथिया जगताप यांनी रुग्णांसाठी व्यावसायिक मार्गदर्शन केले व हिमोफिलिया रुग्णांसाठी योग्य व्यायाम प्रकार कसे असावेत याबद्दल मार्गदर्शन केले.
कार्यक्रमात डॉ. गीता पवार, डॉ. प्रवीण कोळी, सिंथिया जगताप (फिजिओथेरेपिस्ट) उपस्थित होत्या. या सर्वांनी रुग्णांशी संवाद साधून त्यांना हिमोफिलिया या आजारावर योग्य उपचार मिळवण्यासाठीचा आत्मविश्वास दिला. कार्यक्रमादरम्यान इंटास फाउंडेशनचे कार्य, त्यांच्या सामाजिक जबाबदारीची जाणीव आणि समाजासाठी घेतलेला पुढाकार यावरही उपस्थितांनी विशेष भर दिला.
या यशस्वी उपक्रमामध्ये सुरज माळी (प्रकल्प सहायक, पुणे), भक्ति केळगणे, प्रवीणा गेडाम या इंटास फाउंडेशनच्या टीमनें मोलाची भूमिका बजावली. त्यांचे तळमळीचे काम आणि सातत्यामुळे उपक्रमाला अधिक व्यापक परिणाम मिळाला. याशिवाय दाभोळकर हॉस्पिटलच्या टीमने ही सक्रिय सहभागामुळे रुग्णांच्या मदतीसाठी आवश्यक असलेले वैद्यकीय सहकार्यही सहजतेने उपलब्ध झाले.
या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांनी समाधान व्यक्त केले व इंटास फाउंडेशन तसेच दाभोळकर ट्रस्ट हॉस्पिटल कोल्हापूर यांचे आभार मानले. रुग्णांनी अशा उपक्रमांची सातत्याने गरज असल्याचेही नमूद केले. हा उपक्रम केवळ औषधोपचारापुरता मर्यादित न राहता, रुग्णांना आत्मनिर्भर बनवण्याचे, त्यांना त्यांच्या आजाराविषयी सजग करण्याचे आणि मानसिक आधार देण्याचे मोठे कार्य करत आहे. इंटास फाउंडेशनच्या या पुढाकारामुळे हिमोफिलिया रुग्णांच्या आयुष्यात नव्या आशेचा किरण उमटला आहे. या उपक्रमाने समाजात सकारात्मक संदेश पोहोचवला असून, भविष्यातही अशी मदत अविरत सुरू राहील, अशी आशा व्यक्त केली जात आहे.

पान १ वरून...

### बीड जिल्ह्यात मोफत वाळू योजना नावापुरतीच!

बोलले जात आहे. तहसीलदार यांच्यावर कारवाई केली गेली नाही यामुळे शासनाच्या या धोरणावर शंका उपस्थित होत आहे.
वाळू मोफत असल्याचा दावा प्रशासनाकडून केला जात असला तरी प्रत्यक्षात नागरिकांना एका हायवा (टिपर) रेतीसाठी तब्बल ३० हजार ते ३५ हजार रुपये मोजावे लागत आहेत. एका हायवासाठी सुमारे ५ ट्रॅक्टर ट्रिप्सची गरज भासते. एका ट्रिपसाठी साधारण दोन ते तीन हजार रुपये घेतले जातात. यावरच सुमारे पंधरा हजार रुपये खर्च होतो. त्यानंतर या वाळू हायवात भरणं, त्याचं ट्रान्सपोर्टिंग यासाठी अतिरिक्त ५००० रुपये आकारले जातात. त्यात ट्रॅक्टर मालक, दलाल, खाजगी एजंट यांचाही वाटा असतो. या सगळ्या प्रकारामुळे घरकुल योजनेचे मूळ उद्दिष्टच हरवत चालले आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी असलेल्या योजनेचा लाभ खाजगी ट्रॅक्टर मालक आणि रेती दलाल घेत असल्याने नागरिकांमध्ये संताप आहे.

### अवैध वाळुची चोरटी वाहतुक करणारे टेम्पोवर कारवाई

परवाना / रॉयल्टी बाबत विचारपुस केली असता सदर चालकडे कसलीही वाळू वाहतुकीची रॉयल्टी परवाना मिळून आला नाही म्हणुन टेम्पो टाटा-७०९ ब्राउन रंगाचा पासींग क्रं. चक-१४ एच्-३४९२ व त्यामधील अंदाजे दीड ब्रास वाळु अशी एकूण किंमती ६०९०००/- (सहा लाख नऊ हजार) रुपयाचा माल दोन पंचासमक्ष जप्त करुन पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे दादासाहेब नारायण सानप पोना/१९२५, पो.स्टे बीड ग्रामीण यांचे फिर्यादीवरुन विनापरवाना बेकायदेशिर चोरटी वाहुतक करणारा चालक नामे गोकुळ किसन गायकवाड वय ३२ वर्षे रा. वासनवाडी ता.जि. बीड यांचे विरुध्द गुन्हा दाखल करुन मिळून आलेला चालक आरोपी यास आज दिनांक १०/०६/२०२५ रोजी अटक करण्यात आली आहे.
तसेच कुमशी रोडवरील रामगडाचे बाजुला विनापरवाना अवैध वाळूचा अंदाजे १५ ते १६ ब्रास साठा मिळून आल्याने महसुल विभागातील मा. तहसीलदार बीड यांचे ताब्यात पुढील कायदेशीर कारवाई कामी देण्यात आला आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक साहेब, बीड श्री नवनीत कॉवत, अपर पोलीस अधिक्षक श्री सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग बीड श्री कमलेश मिना साहेब यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री. मारुती खेडकर, श्री. काकरवाल, पोउपनि श्री. कुकलारे, पोह/१२८० प्रसाद कदम, पोह/ बाळासाहेब दुबाले, पोना/१९२५ दादासाहेब सानप यांनी केली.

### पेठ बीड पोलीस ठाणे हद्दीत तलवार

रा.पिंपळगाव ता.केज जि.बीड ह.मु.एम.आय.डी.पेठ बीड हा दोन धारदार तलवारीसह मिळून आल्याने त्याच्यावर अवैध शस्त्र बाळगल्या प्रकरणी ताब्यात घेतल्यात आले. ही कारवाई बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि नित्यानंद उबाळे सोबत पो ह १३५३/सुभाष मोटे, पो ह १०६५/नितीश माने, पो अं २२१८/विष्णु गुजर, पो अं ३६७/शरद पोकळे यांनी केली.पेठ बीड पोलिस पो.अं २२१८/विष्णु गुजर यांच्या फिर्यादीवरून तलवार बाळू प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

### दीपक थोरात यांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे नियुक्तीपत्र देऊन केली घोषणा

जातीयवादी समजल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्याचा कलंक पुसण्यासाठी महाराष्ट्र आधार सेना हा ना जातीचा ना धर्माचा हे ब्रीदवाक्य घेऊन मैदानात उतरले आहे. दीपक थोरात यांच्या संघटनेला चांगल बळ मिळायला सुरुवात झाली आहे. बीड जिल्ह्यामध्ये अनेक जाती धर्मातील लोक त्यांच्या संपर्कात आहेत. काल वडवणी मधील नवनिर्वाचित पधिकार्यांचा सत्कार व निवडीचे पत्र देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष तथा दैनिक महाराष्ट्र आरंभाचे संपादक दीपक थोरात, महाराष्ट्राचा सेनेचे कार्याध्यक्ष उद्धव आरे, महाराष्ट्र आधार सेनेचे युवा नेते अमोल भैया मुजमुले, करण सरवदे, बाबू हतागळे, जावेद पठाण, सुभाष नवनाथ तांबडे, शेंडगे मामा सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांवर महाराष्ट्र भारत व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. तरी यावेळी गोरगरिबात जनतेच्या व जनसेवेसाठी या संघटनेची स्थापना केलेली आहे. यावेळी माजलगाव मतदार संघामध्ये आता मोठ्या प्रमाणामध्ये कार्यकर्त्यांची आवक ही महाराष्ट्र आधार सेनेमध्ये होत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे.

### बीड जिल्हा परिषदेला नवीन कर्तव्यदक्ष व खमक्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिळाले!

करण्यासाठी सक्षम आहेत ते नियमाला अधीन राहूनच कामे करतात कोणत्याही कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांची पाठराखण कधीच करणार नाहीत ते त्यांच्यावरती तात्काळ कारवाई करतील गोंदिया जिल्हा परिषद मध्ये त्यांचा काम हे कौतुकास्पद व उत्कृष्ट पद्धतीने काम केल्याची माहिती आहे.
खाजगी शिक्षक भरती घोटाळ्याप्रकरणांमध्ये घोटाळा करणारे शिक्षणाधिकारी प्राथमिक श्री भगवान फुलारी यांनी संस्थाचालकांच्या कायम मान्यता व विनाअनुदानित वरून शंभर टक्के अनुदानित वरती केलेले बदली प्रकरण तसेच अंशतावरून शंभर टक्के अनुदानित वरती दिलेल्या नियुक्त्या या सर्व संचिका या प्राथमिक विभाग व माध्यमिक विभागामधून संबंधित संस्थाचालकांनी फाईली अप्रूव्हलच्या गहाळ केली आहेत तसेच पे युनिट मधील बिले ही गहाळ झाली आहे या सर्व प्रकरणांमध्ये नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे जिल्ह्यातील सर्व सामाजिक कार्यकर्ते संघटना यांचे लक्ष लागलं आहे.
जिल्हा परिषद मध्ये शिक्षण विभाग व इतर विभागांमध्ये प्रतिनियुक्त तात्काळ रद्द करण्याचा अहवाल नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासमोर आहे
तालुक्यातील काही अधिकारी जिल्हा परिषद बीडच्या प्रांगणामध्ये दिवसभर काळे कारनामे करत बसलेल्या असतात त्यांचे कोणतेही काम या ठिकाणी नसते परंतु हे जिल्ह्याच्या ठिकाणी येऊन दिवसभर वेळ घालून तालुक्याचे कार्यालय वाऱ्यावर सोडून काम चुकार अधिकाऱ्यावरती भेट देऊन त्यांच्यावरती कारवाई करण्याचे आव्हान मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांच्या वरती आहेत.
बीड जिल्ह्यामध्ये ज्या खाजगी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संस्थांमध्ये बोगस शिक्षक भरती करण्यात आली त्यांचे कायम मान्यता व न्यायालयाच्या आदेशाचा संदर्भ देऊन व न्यायालयाच्या आदेशाची दिशाभूल करून वेगळा अर्थ काढून देण्यात आलेल्या सर्व नियुक्त्या व त्यांच्याकडील असणाऱ्या सर्व फायली व वेतन अधीक्षक कार्यालयामार्फत करोडो रुपय थकीत वेतांच्या माध्यमातून बेकायदेशीर उचललेल्या पैशांचा लवकरच छडा लावण्याचा आवाहन व बनावट स्वाक्षऱ्याच्या आधारे देण्यात आलेल्या शिक्षण सेवक व कायम मान्यतेचे रॅकेट सर्वांच्या समोर लवकरच आणतील अशी नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडून बीड जिल्हा वासियांची अपेक्षा आहे.
जिल्हा परिषदे अंतर्गत विविध विभागामार्फत देण्यात आलेले प्रति नियुक्त्या व अतिरिक्त पदभार बेकायदेशीर देण्यात आलेले सर्व प्रतिनियुक्त्या आपण रद्द करावे जे की भ्रष्टाचार करण्यामध्ये सर्वात जास्त ज्यांच्या प्रतिनिउत्त्या केल्या आहेत तेच वरिष्ठ अधिकाऱ्यांना पाठबळ देतात त्यामुळे त्यांच्या प्रतिनियुक्त्या सर्व विभागामार्फत माहिती मागून आपणा समोर प्रतिनियुक्त्या रद्द करून कारवाई करण्याचं मोठं आव्हान आहे.
नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड यांच्या बाबतची माहिती हे गोंदिया जिल्ह्यातील व जिल्हा परिषदेतील कर्मचारी व अधिकारी यांच्याकडून घेत आहेत तसेच बीड जिल्ह्यातील संस्थाचालक वेगवेगळ्या विभागाचे अधिकारी कर्मचारी व शिक्षणाधिकारी हे एकमेकाला दूरध्वनीवर संपर्क करून मुख्य कार्यकारी अधिकारी साहेबांनी कसे काम केले त्यांचा स्वभाव कसा आहे त्यांनी त्यांचे कार्यकाळ मध्ये कशी शिस्त लावली व कोणकोणत्या कारवाही केल्या याबाबत विचार ना करतात परंतु जेवढ्या लोकांनी काही माहिती घेतली आहे त्या सर्व लोकांनी सांगितलेलं आहे की संबंधित मुख्य कार्यकारी अधिकारी यांना फक्त शासनाच्या नियमाने निर्देशन नुसार काम करण्याची आवड आहे इतर गोष्टींमध्ये किंवा भानगडीमध्ये पडण्याची त्यांची कोणतीही सवय नाही ते शिस्तप्रिय व शासनाच्या नियमांमध्ये कामे करावी व वेळेमध्ये कार्यालयामध्ये उपस्थित रहावे व लोकांचे कोणतेही काम प्रलंबित ठेवण्यात येऊ नये यासाठी त्यांचा खूप मोठा प्रयत्न आहे तसेच त्यांच्या दलनामध्ये कोणत्याही अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी येऊ वेळ वाया घालू नये असे त्यांचे सक्तीच्या सूचना असतात फक्त आपल्या कार्यालय मार्फत फाईल संचिका पाठवण्यात याव्या व माझ्याकडे येऊन वेळ घालू नये तो वेळ लोकांच्या कामासाठी वापरावा असे त्यांच्या कामाची पद्धत आहे फक्त आवश्यक असणाऱ्या मीटिंग वेळी आपणाला कळवण्यात येईल त्याच वेळेस आपण माझ्या दालनात यावे असे काम नवीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आहे. जिल्हा परिषद बीड मधील भ्रष्टाचार करणारे अधिकारी कर्मचारी व दलाल यांचे धाबे दणाणले कर्तव्यदक्ष व खमक्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिळाल्याने बीड जिल्हा परिषदेमध्ये मागील अनेक वर्षापासून आणि लोकांची कामे प्रलंबित आहेत व दलालमार्फत व वशिल्यामार्फत होणारी कामेही आता डायरेक्ट नागरिक व मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याशी चर्चा करून नियमानुसार होणार आहेत जिल्ह्यातील जनतेमध्ये असे कर्तव्यदक्ष अधिकारी मिळाल्यामुळे आनंद व्यक्त होत आहे.

# मुदतबाह्य खानपट्टा यांची तपासणी करण्याचे महसूल मंत्र्याचे निर्देश

## बीड जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या कामाची पद्धत पाहता कारवाई होईल का यावर संशय : अजय सरवदे

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये मुदत संपुष्टात आलेल्या १२ स्टोन क्रेशर व ५३ खानपट्टाधारकांची माहिती विज बिल न भरल्याने याबाबतीत शासनास व मंत्री महोदयांना तक्रार सादर केली होती. तक्रारीच्या अनुषंगाने नियमानुसार मंजूर व नूतनीकरण केलेल्या काही खाणपट्टाधारकांकडून खानपट्टा आदेशातील, करारनाम्यातील व पर्यावरण अनुमतीमधील अटी व शर्तीचा भंग होत असल्याबाबत शासनाकडे वारंवार तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, त्या अनुषंगाने महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियमामधील नियम ८० नुसार राज्यातील गौण खनिजांच्या खाणपट्ट्यांची मोहीम स्वरूपात तपासणी करणे आवश्यक आहे असे पत्र काढले आहे.





बीड जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी अनधिकृत व मुदत संपुष्टात आलेल्या खानपट्टा व स्टोन क्रेशर धारक यांच्यावर तात्काळ नियमानुसार दंडात्मक कारवाई करून संबंधित खानपट्टा व स्टोन क्रेशर सील करून दोन दिवसात अहवाल सादर करण्याचे निर्देश तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांनी दिली होते. तसेच अनाधिकृत व मुदतबाह्य खानपट्टा बस स्टोन क्रेशर यांचा विद्युत पुरवठा बंद करण्यासाठी अधीक्षक अभियंता महावितरण मंडळ कार्यालय बीड यांनाही पत्र व्यवहार केला होता.

सदर प्रकरणी तत्कालीन जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत संबंधित मुदतबाह्य खानपट्टा व स्टोन क्रेशर धारकांकडून आर्थिक व्यवहार करत कारवाई केली नाही. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशाला महत्व न देणाऱ्या उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली होती.

### ७ दिवसाच्या आत परिपूर्ण माहिती शासनास सादर करण्याचे आदेश

जिल्ह्यातील खाणपट्ट्याची तपासणी करण्यात यावी आणि तपासणीत खाणपट्टाधारक यांनी अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यास प्रचलित कायद्यातील व नियमावलीतील तसेच करारनाम्यातील व पर्यावरण अनुमतीमधील तरतुदीनुसार आपण कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती ७ दिवसात शासनास सादर करावी. शासनाने कितीही खानपट्टा तपासणीसाठी नमुने/अर्ज पाठवले तरी बीड जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचारी यांच्यात दडलेले नमुने यामधून आर्थिक व्यवहार करत कारवाई तर करणारच नाहीत पण खोटी माहिती शासनास सादर करतील.

**– अजय सरवदे,** जिल्हाध्यक्ष,
वंचित बहुजन आघाडी बीड (प.)



हनुमान विद्यालयाचा विद्यार्थी करण बाबासाहेब कांबळे यांनी दहावीच्या परीक्षेत ९० टक्के गुण प्राप्त केल्याबद्दल त्याचा आष्टीतील कार्यक्रमात आमदार सुरेश धस यांनी सत्कार केला.

# वैद्यनाथच्या गाभाऱ्यात भाविकांची विसरलेली बॅग केली परत



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

वैद्यनाथ मंदिरात दर्शनासाठी आलेल्या सुनिता जाधव आणि अनिता जाधव या भाविकाची हॅन्ड बॅग मंदिराच्या गाभाऱ्यात विसरलेली होती. बॅगमध्ये रोख पाच हजार रुपये व सॅमसंग कंपनीचा मोबाईल फोन होता. गाभाऱ्यात तैनात असलेल्या सुरक्षा कर्मचारी बबली वाघमारे यांनीही बॅग आढळल्यावर तात्काळ ही मंदिरातील पोलीस चौकीत जमा केली.

पोलीस चौकीचे इन्चार्ज स.पो. उपनिरीक्षक राजाराम शेळके यांनी तात्पर्तने शोध घेऊन संबंधित भाविकाशी संपर्क साधला व त्यांना बॅग परत केली. या प्रमाणित व तात्पर कृतीमुळे भाविकांनी पोलीस विभागाचे आभार मानले असून. बबली वाघमारे यांच्या प्रमाणिकपणाचे कौतुक सर्वत्र होत आहे.

ही घटना भाविकांमध्ये सुरक्षितेचा विश्वास निर्माण करणारी असून प्रमाणिकतेचा उत्तम आदर्श ठरली आहे. अशावेळी भाविकाची मंदिर परिसरातील सुरक्षा रक्षक व पोलीस प्रशासन यांच्यावर भाविकाने या प्रकारे जर पोलीस रक्षक असतील तर कुठल्याही मंदिरामध्ये चोरी किंवा विसरलेली बॅग भाविकाची परत मिळेल अशा भावना भाविकांनी यावेळी केल्या.

# चौसाळा ते साजापोजा बससेवा तात्काळ सुरु करा अन्यथा बीड आगारामध्ये विद्यार्थ्यांना सोबत घेऊन शाळा भरवणार : आगलावे

चौसाळा । प्रतिनिधी



चौसाळा ते साजापोजा मार्गे बससेवा तात्काळ सुरू करण्यात यावी अन्यथा विद्यार्थ्यांना सोबत घेऊन बीड आगारामध्ये शाळा भरवण्याचा इशारा भारतीय विद्यार्थी सेनेचे माजी बीड जिल्हा सहसचिव सचिन आगलावे यांनी बीड आगार प्रमुखांना दिला आहे.

अनेक विद्यार्थी हे चौसाळा येथे शिक्षणासाठी येत असतात परंतु या ठिकाणी बस सेवा उपलब्ध नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अडचणीचा सामना करावा लागत आहे. या परिसरातील साजा पोजा, देवी बाबळगाव, अंधापुरी, सावरगाव येथील बरेचसे विद्यार्थी हे चौसाळा येथे शिक्षणासाठी जात असतात. या मार्गे कुठलीही बस सेवा नसल्यामुळे विद्यार्थी व पालकांना खूप मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे.

सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याकारणाने विद्यार्थ्यांची गैरसोय होत आहे तरी बीड आगार प्रमुखांनी या प्रमुख मागणीकडे लक्ष देऊन चौसाळा ते साजा पोजा बससेवा चालु करावी अन्यथा दिनांक १५/०६/२०२५ रोजी विद्यार्थ्यांना सोबत घेऊन बीड आगारामध्ये शाळा भरविण्यात येईल याची सर्वस्वी जबाबदारी बीड आगार प्रमुखाची राहील, असा इशारा भारतीय विद्यार्थी सेनेचे माजी बीड जिल्हा सहसचिव सचिन आगलावे यांनी दिला आहे.



# २६ जुन रोजी सामाजिक न्याय दिनी मातंग समाजाचे जालना मध्ये महाआंदोलन

जालना । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात शासन सामाजिक न्याय दिवस साजरा करत आहे पण वंचित जातिंना उपेक्षित ठेवल्या जात आहे त्यांच्या न्यायासाठी कोणतेही निर्णय घेतला जात नाही म्हणून आरक्षणा उपवर्गीकरण कधी करणार सामाजिक न्याय कुठे आहे हा प्रश्न घेऊन जालना मातंग आरक्षण क्रांती दल समन्वय समिती महाराष्ट्र राज्य च्या वतीने मातंग व वंचित अनुसूचित जातिंचे २६-०६-२०२५ सामाजिक न्याय दिनी महाआंदोलन छेडले आहे.

आपण सर्वांनी प्रचंड संख्येने आंदोलनात सहभागी व्हावे, आंदोलनाचे निवेदन जिल्हाधिकारी पांचाळ साहेब यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आले. यावेळी उपस्थित कृष्णा भाऊ पांडव, रवीराज पाखरे, ललित कुचेकर, अमोल मिसाळ, आकाश रणपिसे, रतन कांबळे उपस्थित होते.

# बाल वैज्ञानिक अमेय अकुलवार याची इस्त्रोच्या भेटीसाठी झाली निवड

बीड । प्रतिनिधी



जनसेवा सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक कला व क्रीडा प्रतिष्ठान अहमदनगर आयोजित डॉ. सी. व्ही. रामन बाल-वैज्ञानिक परीक्षेत आदर्श विद्यालया ने घवघवीत यश संपादन केले आहे.

सदरील शाळेतील इयत्ता आठवीत शिकणारे अकुलवार अमेय शैलेश, गवते गौरव विकास, गोरे वैष्णवी दादासाहेब, काळे आयुष दत्तात्रय, मिसाळ संस्कृती गणेश, शेंडगे अनुष्का रामप्रसाद, सुरवसे समृद्धी भैय्यासाहेब, तळेकर काव्या गणेश हे आठ विद्यार्थी सदरील परीक्षेमध्ये चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले आहेत.

यातील अकुलवार अमेय शैलेश या विद्यार्थ्यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) सहलीसाठी निवड झालेली आहे. या यशाबद्दल ज्ञानेश्वर माऊली शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अशोक जाधव, सचिव सविता जाधव, शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता डोके, दीप्ती औटी व शिक्षक वृंद तसेच मित्र परिवाराकडून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.

# चिंता करू नका चिंतामुक्त जीवन जगा : ह.भ.प.इंदुरीकर महाराज

नवगण राजुरी । प्रतिनिधी

हसत-हसत जीवन जगा, आनंदी रहा, चिंता करू नका, चिंतामुक्त जीवन जगा, आनंदा इतकी पवित्र जागा कुठे विश्वात नाही असे प्रतिपादन समाज प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांनी केले. बीड तालुक्यातील पिंपळवाडी येथील शहीद जवान नवनाथ बहिरवाळ यांच्या सातव्या पुण्यतिथी निमित्त सोमवार दि.९ रोजी महाराष्ट्रातील समाज प्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख इंदुरीकर यांचे अमृततुल्य कीर्तन आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी ह.भ.प.शांतीब्रह्म भक्तीदास महाराज शिंदे, लक्ष्मण महाराज मेंगडे, ज्ञानेश्वर महाराज मंझेरीकर, तुकाराम महाराज, राम महाराज डोंगर, सहदेव महाराज शास्त्री, बबन महाराज मंझेरीकर, नाना महाराज कदम, दत्ता महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती. किर्तन सांगताना इंदुरीकर महाराज म्हणाले की, जोपर्यंत गाव आहे तोपर्यंत गावातील चौकाला शहिदांचे



नाव राहणार. तरुणांनी व्यसन करू नका, व्यसनमुक्त रहा, मोर्चे आंदोलने करू नका. दारुड्याने गावाचा नाश केला भांडे विकून काही जण दारू पेले आतापर्यंत गरिबांची लेकरं व्यसनाधीन होऊन गेले श्रीमंतीची नाही. जो मुलगा शहीद झाला त्याच्या आईचे आणि गावाचे नाव अमर झाले. खिशात पैसे आहेत तोपर्यंत लोक तुम्हाला विचारतील त्यानंतर कोणी विचारणार नाही पैसे संपले की तुम्ही संपले. इंद्रियावर ताबा ठेवा ताबा सुटला तर विषय संपला. हरिपाठ आणि काकडा केल्यानंतर जिवंतपणे मोक्ष मिळतो. हरिपाठा सारखा सूत्रबद्ध कोणता ग्रंथ नाही. ज्याचे मित्र चांगले त्याचे जीवन चांगले. मित्राने मित्राला समजावून सांगितले पाहिजे. चुकीचा निर्णय घेतला तर वाईट परिणाम होतात. नालायक मित्राशी कधी दोस्ती करू नका, मित्राने मित्राला संकटापासून वाचविले पाहिजे. नालायकात बसण्यापेक्षा माळकऱ्यात बसून जिंदगी चांगली सुधारा असे ते म्हणाले.

यावेळी माजी आ.जनार्दन तुपे, श्री गजानन नागरी सहकारी बँकेचे संचालक अर्जुन बहिरवाळ, राजाभाऊ गुजर, अंबादास गुजर, सचिन कोठुळे, पंडित माने, सदाशिव सुर्वे, सर्जेराव खटाणे, युवराज बहिरवाळ, मुख्याध्यापक अण्णासाहेब थिटे, प्रदीप जगताप, धनवंत मस्के, राजेंद्र कुन्हे, रावसाहेब भोसले, विलास येडे यांच्यासह परिसरातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, महिला, पुरुष, भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# राष्ट्रीय समाज पक्षाचे जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमानाने साजरा



बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा सामाजिक कार्यकर्ते प्रा अण्णासाहेब मतकर यांच्या वाढदिवसानिमित्त बीड शहरातील जिव्हाळा निवास बेघर या ठिकाणी येथील अनाथ वृद्ध व्यक्तींना अन्नदान व फळ वाटप कार्यक्रम घेण्यात आला होता.

या कार्यक्रमाला उपस्थित युवा मल्हार सेनेचे अध्यक्ष विष्णू दादा देवकते, शिवाजी चांगण, युवा पत्रकार अंकुश गवळी, रुग्णसेवक शरद झोडगे, सामाजिक कार्यकर्ते प्रवीणजी पालीमकर, अमर वाघमोडे, अभिषेक भावले, जिव्हाळा निवास बेघर या केंद्राच्या कर्मचारी छाया सरवदे आदी उपस्थित होते, याप्रसंगी राष्ट्रीय समाज पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष अण्णासाहेब मतकर यांच्यावर राज्यातून शुभेच्छांचा वर्षाव, विविध सामाजिक, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# महादुर्गावर जागर प्रतिष्ठान कडून राज्यभिषेक सोहळा उत्साहात साजरा

धारूर । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील ऐतिहासिक शहर असणाऱ्या धारूर येथील महादुर्ग गडावर जागर प्रतिष्ठानच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५२ वा राज्याभिषेक सोहळा मोठा उत्साह साजरा करण्यात आला दोन दिवसाचे भव्य असे नियोजन या सोहळ्यात करण्यात आले होते राज्याभिषेकांच्या पूर्वसंध्येला रात्री मावळयांच्या गौरवशाली इतिहासाची आठवण करून देणारे मर्दानी खेळ आणि महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजाभवानी गोंधळाच्या आयोजन करण्यात आले होते व तसेच ९ जून सकाळी आठ वाजता टाळा मृदुंगाच्या गजरात भव्य पालखी सोहळा संपन्न झाला त्यानंतर गडाच्या मुख्य दरवाजाला तोरण बांधून कार्यक्रमाला सुरुवात झाली विविध जाती तील ११ जोडप्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक करण्यात आला, राज्याभिषेकासाठी सात किल्ल्यांवरील माती, प्रयागराज येथील महा कुंभाचे पवित्र जल, छत्रपतींच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या सात गडावरील पाणी,



३५२ नाणी आणि विविध साहित्यांनी मंत्रोच्चाराच्या सुमधुरतेने राज्याभिषेक करण्यात आला, गडावरील संपन्न वातावरणाने सोहळ्याला अनोखी शोभा आली कार्यक्रमाच्या सुरुवातीला वैष्णवी काळे यांचे सुमधुर असे गीत गायन झाले.

या कार्यक्रमाला जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष किसन पाटील चव्हाण, क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर, छावा क्रांतिवीर संघटनेचे अध्यक्ष करण भाऊ गायकर तसेच सामाजिक राजकीय शैक्षणिक कृषी इत्यादी क्षेत्रातील नामवंत मान्यवर कार्यक्रमाला प्रमुख उपस्थित होते, तसेच प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.अशोक बांगर यांचे अभ्यासपूर्ण भाषण संपन्न झाले.

गेल्या दोन वर्षापासून जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य ही संघटना धारूरच्या किल्ल्यामध्ये राज्याभिषेक सोहळा साजरा करत आहे तसेच गेल्या पाच वर्षापासून दीपोत्सव सोहळा साजरा करत आहे येणाऱ्या काळातही संघटना ताकतीने सोहळा साजरा करणार गडकिल्ले संवर्धनाच्या हा विचार जागर प्रतिष्ठान कायम पेरीत राहील असे किसन पाटील यांनी संबोधले.

# आज पत्रकार संघाच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

## इयत्ता १० वी आणि १२ वी सह जवाहर नवोदय विद्यालय पात्र, स्कॉलरशिप पात्र, सैनिक स्कूल पात्र गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या शुभहस्ते गुणगौरव सोहळा

बीड । प्रतिनिधी

इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांनी ८५% पेक्षा अधिक गुण घेतले आहेत. अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि जवाहर नवोदय विद्यालय पात्र, स्कॉलरशिप पात्र, सैनिक स्कूल पात्र गुणवंत विद्यार्थ्यांचा तहसीलदार चंद्रकांत शेळके, शिवाजी नगर पोलिस स्टेशनचे पोलीस निरीक्षक केशव पवार सर, बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी समंदर खान यांच्यासह पत्रकार संघाच्या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संघटक संजय भोकरे साहेब, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे सर, प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्या पुढाकारातून बीड जिल्हा शाखेच्या वतीने बीड येथील वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालय, जुनी मारुती सुझुकी शोरूमच्या समोर, बार्शी रोड, बीड येथे सकाळी ११ वाजता महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा सकाळी ११ वाजता होणार आहे. बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक केशव पवार सर, बीड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी समंदर खान, त्याचबरोबर कै. अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थेचे सचिव प्रा. गणेश पोकळे, पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी, नवोदय क्लासेसचे प्रा. माधव घाडगे, अण्णासाहेब पाटील सेवाभावी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. बाप्पासाहेब हावळे, वसंतराव काळे पत्रकारिता महाविद्यालयाचे प्राचार्य रफिक सय्यद सर, बीड जिल्हाध्यक्ष अमजद खान, पत्रकार हल्ला कृती समितीचे बीड जिल्हाध्यक्ष शेख ताहेर, पत्रकार संघाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष अँड विनायक जाधव व दीपक काळकुटे, महिला जिल्हाध्यक्ष शेख आयेशा, बीड जिल्हा सरचिटणीस शेख वसीम, पत्रकार हल्ला कृती समितीचे सचिव शेख अब्दुल, पत्रकार संघाच्या महिला सचिव अनुप्रिता मोरे, जिल्हा संघटक रईस खान, जिल्हा उपाध्यक्ष अय्युब शेख, प्रसिद्धीप्रमुख राम काशीद, बीड संपर्कप्रमुख नितेश उपाध्ये, कार्याध्यक्ष अमोल कापसे, सहसचिव अमोल शिंदे यांच्यासह पत्रकार संघाच्या सर्व प्रमुख पदाधिकारी सदस्य यांच्या शुभहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांना सन्मानपत्र, पेन, पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात येणार आहे. ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी तसेच ज्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केलेली नाही ते सन्मान पात्र विद्यार्थी देखील येताना आपल्या सोबत मार्क्स मेमोची झेरॉक्स आधार कार्डची झेरॉक्स सोबत घेऊन येऊ शकतात. पत्रकार संघाच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याकरता ८५ टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेल्या तमाम विद्यार्थ्यांनी आपल्या पालकांसह मोठ्या संख्येने वरील ठिकाणी उपस्थित राहावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा बीड, पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती, डिजिटल मीडिया शाखा आणि महिला शाखेच्या वतीने करण्यात आले आहे.

### पत्रकारांच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार

प्रिंट मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, सोशल मीडिया अंतर्गत पत्रकार म्हणून अथवा माध्यमांच्या विविध घटकांमध्ये जे काम करणारे पालक आहेत. त्यांच्या ज्या पाल्यांनी इयत्ता १० वी आणि १२ वी परीक्षेमध्ये ७५ टक्के पेक्षा अधिक गुण घेतलेले आहेत.अशा सर्व विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानपत्र देऊन विशेष सन्मानित करण्यात येणार आहे. हा सत्कार स्वीकारण्यासाठी मीडियातील पाल्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

### स्कॉलर विद्यार्थ्यांचाही होणार सत्कार !

विशेष बाब म्हणजे या यावेळी नवोदयला पात्र झालेले विद्यार्थी, स्कॉलरशिप परीक्षेला पात्र झालेले विद्यार्थी, आणि सैनिक स्कूल साठी पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना देखील मान्यवरांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. अशा गुणवंत विद्यार्थ्यांनी देखील मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतरस्ता खुला करून देण्याच्या मागणीसाठी पिराजी शिंदे सहकुटुंबाचे आमरण उपोषण सुरू

## जिल्हा प्रशासन मात्र सस्ती अदालत नावाखाली आपली पाठ थोपटून घेऊन पत्रकबाजी करण्यात व्यस्त

वैद्यकिन्ही । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील वैद्यकिन्ही येथील शेतकरी पिराजी उत्तमराव शिंदे हे वैद्यकिन्ही, वैजाळा या दोन्ही गावांच्या मधला गट नंबर २५४ मधील पश्चिमेकडे जाणारा शिवरस्ता काही शेतकऱ्यांनी जाणिवपूर्वक बंद केल्याने शेतात जाण्यायेण्यासाठी अडचण येत असुन तातडीने खुला करून देण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी बीड आणि तहसीलदार पाटोदा यांना दि.०५ जुन रोजी लेखी निवेदनाद्वारे सहकुटुंब आमरण उपोषणाचा इशारा देऊनही त्याची दखल प्रशासनाने न घेतल्याने आज दि.११ वार बुधवार रोजी सकाळी १० वाजल्यापासून वैद्यकिन्ही ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणाला बसले असुन आमरण उपोषणात पिराजी उत्तमराव शिंदे, पत्नी वैशाली पिराजी शिंदे, आई गंगुबाई उत्तम




शिंदे, मुलगा शिवराम पिराजी शिंदे आणि ३ मुली दिक्षा, प्रतिक्षा, दुर्वा पिराजी शिंदे सहकुटुंब उपोषणाला बसले आहेत. मात्र एरवी पेपरबाजी करणा–या जिल्हा आणि तहसील प्रशासनाला यांच्याकडे लक्ष द्यायला वेळ नाही. नायब तहसीलदार मुळे यांनी फोनवरून २–३ दिवसात प्रश्न सोडवु तुम्ही उपोषण मागे घ्या असा सल्ला दिला तर पिराजी शिंदे हे शिवरस्ता खुला करून दिल्याशिवाय उपोषण मागे घेणार नाहीत यावर ठाम आहेत.

**जिव्हा प्रशासनाची सस्ती अदालत आणि सोमवार तहसील कार्यालयात जनता दरबार म्हणजे केवळ स्टंटबाजी : डॉ.गणेश ढवळे**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शेतकऱ्यांना शिवरस्ते खुले करून देणार यासाठी विभागीय आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली सस्ती अदालत उपक्रम राबविण्यात येत असल्याचे तसेच दर सोमवारी तहसील कार्यालयात जनता दरबार घेऊन प्रश्न निकाली काढण्यात येणार असल्याची दैनिकातुन प्रसिद्धीही दिली मात्र वास्तवात शेतकऱ्यांना शिवरस्ते खुले करून देण्यात यावेत या मागणीसाठी सहकुटुंब आमरण उपोषणाला बसावे लागते आहे. त्यामुळे जिल्हा व तहसिल प्रशासनाने स्टंटबाजी न करता शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केली आहे.



# राष्ट्रवादी जिल्हा कार्यालयात खुर्शीद आलम यांच्या हस्ते ध्वजारोहण

बीड । प्रतिनिधी

आज राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार यांच्या पक्षाचे २६ वर्धापनदिन निमित्ताने बीड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात राष्ट्रवादीच्या सर्व पदाधिकारी कार्यकर्त्यांच्या प्रमुख उपस्थितीत उत्साहात साजरा करण्यात आला आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून विधानसभा अध्यक्ष मदन जाधव सर हे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते, तर तालुका अध्यक्ष बाबासाहेब गोरे यांनी उपस्थितीतांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून राष्ट्रवादी ग्रंथालय सेलचे डॉ.राजेंद्र सानप, राष्ट्रवादी युवक चे शहराध्यक्ष सचिन दुधाळ, जेष्ठ नेते अनिल कर्डुले, शेख सबुर, सुशील जाधव, फैय्याज मन्यार, नितीन खांडे, शेख कलीम, शेषराव तांबे, अभय बीडकर, कुणाल चौहान, सोफ्यान कुरेशी,अमित चव्हाण, महेबुब इनामदार, आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महायुती सरकारच्या फसव्या घोषणे विरोधात शिवसेनेचा उद्या रस्ता रोको

## शेतकरी व लाडक्या बहिणींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे : जिल्हाप्रमुख उल्हास गिराम

बीड । प्रतिनिधी

महायुती सरकार कडुन सत्तेत येण्यापूर्वी शेतकऱ्यांना कर्जमाफी सह अनेक प्रलोभने दाखवली होती, तसेच लाडक्या बहिणींना पण १५०० रुपया वरून २१०० रुपये महिना करू असे आश्वासन दिलेले होते, मात्र सत्तेत आल्यानंतर या आश्वासनाचा महायुती सरकारला विसर पडला. सत्तेवर आल्या नंतर महायुती सरकार सातत्याने शेतकऱ्यावर अन्याय करत असून जुलमी धोरणे राबवून देशोधडीला लावण्याचे काम करत आहे. निवडणुकी पूर्वी ज्या फसव्या घोषणा केल्या त्या विरोधात उद्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले आहे.

अवकाळी पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप पर्यंत नुकसान भरपाई मिळाली नाही, मोफत वीज, पाणंद रस्ते, हर




घर जल, हर घर छत या आश्वासनाकडे ही महायुती सरकारने कानाडोळा करीत दुर्लक्ष केले आहे, म्हणून या विसर भोळ्या सरकारला झोपेतून जागे करण्यासाठी शिवसेना पक्षाकडून क्या हुआ तेरा वादा असा जाब विचारून आंदोलन करण्यात येत आहे त्याचाच एक भाग शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने उद्या बुधवार दिनांक रोजी, सकाळी ११ वाजता, महालक्ष्मी चौक बीड बायपास जवळ संभाजी महाराज यांच्या पुतळ्या शेजारी, भव्य रस्ता रोको करण्यात येणार आहे.

या रस्ता रोको आंदोलनास मोठया संख्येने शेतकरी, लाडक्या बहिणींनी उपस्थित रहावे असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा समन्वयक भाई संजय महाद्वार, जिल्हा संघटक नितीन धांडे, उपजिल्हाप्रमुख राजू महूवाले, हनुमान जगताप आशिष मस्के, सहसंघटक रतन गुजर, युवा सेना जिल्हा संघटक अभिषेक दिवे, महिला आघाडी जिल्हा संघटक मीरा ताई नवले, विधानसभा प्रमुख सुशील पिंगळे, कामगार आघाडीचे जिल्हा संघटक रवी वाघमारे, अल्पसंख्यांक आघाडीचे संघटक सय्यद नय्युम, शिव वाहतूक सेनेचे मशरू पठाण, सतीश परदेशी, दिलीप पवार, गणेश लोणकर, नवनाथ प्रभाळे, प्रदीप कोटुळे यांनी केले आहे.

# स्वता:चा आर्थिक स्वार्थ साधत नसल्याने गावच्या विकास कामाच्या निराधार तक्रारी

## गावचा विकास पारदर्शक– सरपंचपती आण्णासाहेब शिरसाठ

दौलावडगाव । प्रतिनिधी

गेल्या अनेक वर्षांपासून गावातील ज्या विकास कामाला खिळ बसली होती. कामे प्रलंबित होते, कागदोपत्री कामे दाखवून निधी हडप करून खिशात घातला जात होता. याला पायबंद घालून जनतेने विश्वास दाखवून आम्हाला निवडून दिल्यानंतर दोन वर्षांत गावाचा विकास कामाच्या माध्यमातून कायापालट केला. हेच विकास कामे डोळ्यात खुपत असल्याने काही विघ्न संतोषी लोकांचा आर्थिक स्वार्थ साधणे बंद झाल्याने विकासकामाच्या निराधार तक्रार करू लागले. पण गावचा विकास पारदर्शक असल्याचे सरपंचपती आण्णासाहेब शिरसाठ यांनी माध्यमांशी बोलताना

आष्टी तालुक्यातील आरणविहरा–तांगडखेल ग्रुप ग्रामपंचायत असून, या



ग्रामपंचायत अंतर्गत गावात विविध निधी सोबतच अनेक ठिकाणी पदरमोड करून कामे केली आहेत. सीसीटी, दलितवस्ती सुधार योजनेची कामे, रोजगार हमी योजनेचे कामे, पथदिवे, गाव अंतर्गत रस्ते, शाळेची संरक्षण भिंत, अनेक वर्षांपासून स्मशानभूमी नव्हती, तो प्रश्न मार्गी लावला, सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लावला, यासह अनेक कामे दर्जेदार केली आहेत.

पण गावातील काही विघ्न संतोषी लोकांनी स्वताच्या आर्थिक फायदा व्हावा. बोगस केलेल्या कामाचे पैसे घरात जावेत. यासाठी ग्रामपंचायतीची बदनामी करत आहेत. समोरासमोर बसून विकास कामे, आलेला निधी, खर्च झालेला निधी आम्ही गावाला दाखवू, पण असा बदनाम करण्याचा प्रयत्न करू नये, स्वच्छ व पारदर्शक कारभार ग्रामपंचायतीचा असून अधिकाऱ्यांनी इन कॅमेरा चौकशी करावी.उगाच निराधार तक्रार होत असल्याचे सरपंच पती आण्णासाहेब शिरसाठ यांनी सांगितले.

# नगर परिषद निवडणूकीच्या आचारसंहितेपूर्वी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी द्या! माजी नगरसेवकांची मागणी

## नगर परिषदेला प्रस्ताव सादर करण्याबाबत पत्र देऊन प्रस्तावित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देऊन अनुसूचित जाती प्रभागातील विकासकामे जलद गतीने पूर्ण करा!!

## सत्तेत असून ही विकास कामें होत नाहीत ना.अजित पवार गटाच्या माजी नगरसेकांत नाराजीचा सुरु!!!







बीड । प्रतिनिधी

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेअंतर्गत अनु. जातीच्या लोकसंख्येनुसार राखीव प्रभागात अनुसूचित जाती वस्त्यांमध्ये सामाजिक सभागृह, वाचनालय, अभ्यासिका, ग्रंथालय, उद्यान, रस्ते, नाल्या व इतर अत्यावश्यक विकास कामे प्रस्तावित करून सदरील कामे केली जातात. जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत योजनेच्या प्रस्तावित आराखड्यास मान्यता देऊन निधी दिला जाते. निधी खर्च करण्याचे सर्वस्वी अधिकार जिल्हा नियोजन विभाग, प्रशासनास असल्याने दर वर्षी जानेवारी महिन्यात जिल्हा नियोजन समितीची बैठक घेऊन निधी ची तरतूद करत नगर परिषदेस प्रस्ताव सादर करण्या बाबत पत्र दिले जाते.

परंतु २०२५–२६ या आर्थिक वर्षाचा कालावधी लोटला असून जून महिन्याचा एक आठवडा पूर्ण होत आला तरी देखील अद्याप पर्यंत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजनेचा निधी तसेच संबंधित योजनेचे तरतुदी, प्रस्ताव सादर करणे बाबत चे पत्र, नगर परिषद बीड यांना देण्यात आलेले नाही. त्यामुळे बीड शहरातील अनुसूचित जाती राखीव प्रभागातील विकासात्मक कामे खोळंबले असून त्यावर दुष्काळाचे सावट पसरले आहे.

सध्या नगर परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुरू असून निवडणूक आयोगामार्फत कधीही निवडणुकीची घोषणा होऊन आदर्श आचारसंहिता लागू होऊ शकते असे झाल्यास अनुसूचित जातीच्या समाज बांधवांवर तसेच राखीव प्रभागावर अन्याय होऊन अनुसूचित जातीच्या वस्त्या विकासापासून वंचित राहू शकतात त्यामुळे अनुसूचित जाती राखीव प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी नगर परिषद निवडणूकीच्या आचारसंहितेपूर्वी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना सन २०२५–२६ अंतर्गत मंजूर निधीच्या अनुषंगाने नगर परिषद बीड यांना प्रस्ताव सादर करण्याबाबत पत्र देऊन प्रस्तावित प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देऊन अनुसूचित जाती प्रभागातील विकासकामे जलद गतीने पूर्ण करण्यात यावे अशी मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे जेष्ठ माजी नगरसेवक भिमराव वाघचौरे, ॲड विकास जोगदंड, माजी नगरसेविका सौ.पुजा गणेश वाघमारे, सौ.रत्नमाला बाबुराव दुधाळ, सौ.मिना बिबिशन लांडगे सह आदींनी निवेदनाद्वारे केली आहे. सत्तेत असून ही विकास कामें होत नसल्याने ना. अजित पवार गटाचे माजी नगरसेवकांतुन नाराजी व्यक्त होत आहे.

# ना.पंकजा मुंडे यांच्या निवासस्थानी खा. छत्रपती उदयनराजे भोसले यांची सदिच्छा भेट

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या मुंबईतील रामटेक या शासकीय निवासस्थानी छत्रपती शिवाजीमहाराज यांचे वंशज खा.श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांनी प्रथमच सदिच्छा भेट दिली. या औपचारिक भेटीचे स्वरूप अत्यंत मनमोकळे आणि आत्मीयतेचे ठरले.



यावेळी ना. पंकजाताई मुंडेयांनी महाराजांचे हृदयपूर्वक स्वागत केले. भेटीदरम्यान, दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडेसाहेब आणि उदयनराजे भोसले यांच्यातील जुने राजकीय व कौटुंबिक संबंध, आठवणींमधून उजळत गेले. या चर्चेतून दोन्ही कुटुंबांमधील स्नेहबंध पुन्हा दृढ झाल्याचे जाणवले. या प्रसंगी आ. सीमाताई हिरे तसेच इतर शिष्टमंडळही उपस्थित होते. या भेटीमुळे केवळ औपचारिकतेपेक्षा एक विशिष्ट आत्मीयता आणि भावनिक संवादाचा क्षण उपस्थित झाला.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब क्या हुआ तेरा वादा

बीड । प्रतिनिधी

विषय सत्ताधारी तिन्ही पक्षाने शेतकऱ्यांन लगोलग कर्ज माफी देण्याचा गाजावाजा केला तसेच वेळेत कर्जफेड करणाऱ्यांना प्रोत्साहन अनुदानाचा पत्ता नाही सरकारने सरड्याला लाजवेल इतक्या वेगाने रंग बदलला कर्जमाफीच्या अपेक्षित असलेले शेतकऱ्यांना आर्थिक वर्ष संपत आले असताना कर्ज भरण्यासाठी सांगून अर्थमंत्री अजित पवारांनी त्यांची क्रूर थट्टा केली याचाच परिणाम म्हणून गेल्या सात महिन्यात राज्यात शंभर पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे शेतकऱ्यांच्या मार्फत राज्याचे तिजोरीत जाणारा जीएसटी अनुदान स्वरूपात शेतकऱ्यांना परत करण्याच्या बाता मारल्या मात्र जीएसटी अद्याप शेतकऱ्यांच्या वाटेला आलाच नाही सोयाबीन आणि कापसाचे भाव पाढण्यासाठी परदेशातून हे पीक आयात करण्याचे फतवे काढले जात आहेत.

शेतकऱ्यांना सन्मान योजनेची रक्कम १२००० हून पंधरा हजार रुपये करण्याचे आश्वासन केवळ बाजार गप्पा ठरले आहेत शेतमाल खराब न होण्यासाठी शेतगृह देण्याचे बोलले पण आज पावसाने खराब झालेल्या पिकाचे नुकसान हे सरकारला उघड्या डोळ्याने दिशेने असे झाले आहे. हमीभावाची दीडपट बोलतात ही शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे उत्पादन खर्चाच्या दीडपट हमीभावाची घोषणा म्हणजे शेतकऱ्यांच्या तोंडाला पाणे पुसण्यासारखे आहे सरकार फक्त कागदावरच आकडेवारीचा खेळ करते आणि प्रत्यक्षात अन्नदात्याला वाऱ्यावर सोडून त्याच्या जखमेवर मीठ चोळते आहे एक रुपयात पिक विमा योजनेची घोषणा करून शेतकऱ्यांची फसवणूक करण्यात आली होती योजना आता बंद केली असून विमा कंपनीने दीड लाख कोटी पेक्षा




शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे

जास्त प्रीमियम गोळा करून पन्नास हजार कोटींपेक्षा अधिक रक्कम स्वतःच्या खिशात घातली आहे मात्र शेतकऱ्यांना नुकसानीची भरपाई सोडा साधे पंचनामे झालेले नाहीत ४५ हजार गावांमध्ये पादंन रस्ते घेण्याची घोषणा केवळ कागदावरच राहिली शेतकऱ्यांचे हाल अजूनही तसेच आहेत कारण आश्वासनाची पूर्तता कधी होणार हे कुणालाच माहिती नाही अन्नदाता बनेल ऊर्जा दाता ही योजना केवळ एक निव्वळ धुळफेक आहे.

आजही अनेक शेतकरी लोड सीडींग ने त्रस्त आहेत सबसिडीचे आकडे मोठे असले तरी ती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही आणि ऊर्जादा बनण्याऐवजी अन्नदाता आजही अंधारातच आहे हर घर जल हर घर छत या योजनेच्या माध्यमातून मोठे स्वप्न दाखवले खरी पण अमलबजावणीतील त्रुटी हा भ्रष्टाचार आणि दिरंगाई मुळे जनतेची घोर निराशा झाली आहे. घोषणा करून दिशाभूल करणे ऐवजी सरकारने या योजनाची प्रभावी अंमलबजावणी करावी अन्यथा हे केवळ जुमले ठरतील अशी भीती व्यक्त होत आहे मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाची उपेक्षा हे या सरकारचे एक मोठे अपयश आहे २० १८ पासून ४० ते ४५ हजार कोटींचा हा प्रकल्प केवळ कागदावरच रेंगाळत राहिला आहे तर मराठवाडा आजही टँकरच्या पाण्यावरच तक धरून आहे निधीचा अभाव राजकीय इच्छाशक्तीची कमतरता आणि अंमलबजावणीतील दिरंगाई यामुळे हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प केवळ घोषणाचा पाऊस ठरला असून मराठवाड्याची तहान कायम आहे. जर या सरकारने येत्या पंधरा दिवसात आजच्या ट्रॅक्टर मोर्चाच्या आंदोलनामध्ये घेतलेले तेरा मुद्दे शेतकरी बांधवांच्या हिताच्या आहेत हे जर पूर्णत्वास नाही काढले तर येणाऱ्या काळामध्ये शिवसेनेच्या तीव्र स्वरूपाचे आंदोलनाला या सरकारला सामोरे जावे लागणार आहे. या आंदोलनाचे नियोजक शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख आजिनाथ भाऊ खेडकर युवा सेनेचे तालुकाप्रमुख साईनाथ ढाकणे अल्पसंख्याक उपजिल्हाप्रमुख लालाभाई पठाण यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. यावेळी उपस्थित नामदेवा गाव नारायणगाव रिजवान भाई पठाण सासंग बडेसंदीप डोंगरे योगेश बडे सचिन खाडे छत्रपती नन्नवरे व शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT